जा.क्र उविम/भांडार/374/२०२०
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
दि. 20 FEB 2020

प्रति,

......................................

......................................

**विषय :– उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रीया कार्यक्रमातील उपस्थित शेतकऱ्यांना चहा, नाष्टा व जेवण पुरविणेसाठीचे दरपत्रक सादर करणेबाबत...**

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे **मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रीया प्रशिक्षण कार्यक्रमाचे** आयोजन दिनांक २९ फेब्रुवारी २०२० रोजी करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित शेतकऱ्यांना चहा, नाष्टा व जेवण पुरविणेसाठीचे दरपत्रक खालीलप्रमाणे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | तपशिल | प्रमाण | दर रू. (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १ | चहा – सकाळ व दुपार | २०० नग | |
| २. | नाष्टा– सकाळ | १०० नग | |
| ३. | भोजन (शाकाहारी– पुरी, बटाटाभाजी, कुर्मा, भात, डाळ, सोलकढी, लोणच, पापड, इ.) | १०० नग | |

तरी वरील तक्त्याप्रमाणे कार्यक्रमाकरीता चहा, नाष्टा, व जेवण पुरविणेसाठीचे दरपत्रक या कार्यालयात **दि. २७.०२.२०२०** प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होण्याऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर " **उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रीया कार्यक्रमाकरीता चहा, नाष्टा, व जेवण पुरविणेसाठीचे दरपत्रक** " असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावे व ते दि. ३१/03/2020 पर्यंत लागू असावे.
३) दरपत्रकातील दर हे साहित्य उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ कार्यालयास पोहोच देण्याचे असावे.
४) दरपत्रक **सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग–** ४१६५२० या पत्यावर पाठवावे.
५) दरपत्रकात या दरपत्रकाच्या संदर्भाचा उल्लेख असावा.
६) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
७) दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग